# किटकनाशक हाताळताना अशी घ्या काळजी

**प्रा. वैभव गिरी**
सहाय्यक प्राध्यापक (कृषि किटकशास्त्र विभाग)
रामकृष्ण बजाज कृषि महाविद्यालय, पिपरी-वर्धा

आधुनिक किटकनाशके व रोगनाशके इतकी विषारी आहेत की, त्यांचा योग्य रितीने वापर केला नाही तर माणूस व इतर पाळीव जनावरे यांच्या जीवीताला धोका पोहोचतो. त्यासाठी अशा औषधांपासून जीवितास हानी किंवा धोका होऊ नये या दृष्टीने पुढील बाबी नेहमी लक्षात ठेवाव्या.

(१) किटकनाशक व रोगनाशक औषधांच्या पिशव्या काळजीपूर्वक फोडाव्यात तोंडाने (दातांनी) पिशव्या फोडू नये. तसेच किटकनाशक औषधे असलेल्या बाटल्यांची झाकणे सावकाश उघडावीत चेहऱ्यावर, डोळ्यांवर उडणार नाही याची काळजी घ्यावी.

(२) खाद्यपदार्थ, इतर औषधे व लहान मुले यांच्याशी औषधांचा संपर्क येणार नाही याची काळजी घ्यावी.

(३) औषध मारण्याच्या कामासाठी हातापायांवर जखम झालेल्या माणसाची निवड करु नये कारण जखमेवाटे या विषारी औषधांचा शरीरामध्ये शिरकाव होऊन धोका पोहोचण्याचा शक्यता असते.

(४) बऱ्याच वेळा पिकावर फवारण्याचे औषध आजूबाजूच्या गवतावर पडण्याचा संभव असतो. शक्यतो ते गवतावर पडणार नाही याची काळजी घ्यावी. कारण तेच गवत आपण जनावरांना खायला दिल्यास त्यापासून जनावरांना धोका असतो.

(५) कीटकणाशके मुलाबाळाच्या हाती लागणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

(६) सर्व विषारी औषधांच्या बाटल्यांवर किंवा डब्यांवर मोठ्या अक्षरामध्ये त्या औषधाचे नाव लिहून ती औषधे थंड व कोरड्या जागी कुलुपामध्ये सुरक्षित ठेवावीत.

(७) डब्यातून किंवा बाटलीतून औषध काढतांना त्यात नळी घालून तोंडाने औषध वर ओढू नये.

(८) औषधी तयार करतांना व फवारणी करतांना शक्यतो हातात रबरी हातमोजे घालावेत.

(९) फवारण्याचे मिश्रण किंवा उंदरांसाठी विषारी गोळ्या तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी मातीची भांडी, रीकामे डबे किंवा बाटल्या घरगुती कामासाठी (उदा. गोडतेल, पाणी इत्यादी साठी) वापरू नये. ते जमिनीमध्ये खोल पुरावून टाकावे व धातुची भांडी साबण, सोडा व माती यांनी स्वच्छ धुवून घ्यावीत.

(१०) औषधांचे मिश्रण तयार करण्याचे किंवा फवारण्याचे काम चालू असतांना खाणे, पिणे किंवा धूम्रपान करु नये. त्यामुळे औषध पोटात जाण्याची शक्यता असते. तसेच औषध फवारण्याच्या पंपाच्या नळीतील घाण किंवा कचरा तोंडाने फुंकून साफ न करता तो तारेने साफ करावा.

(११) किटकनाशक औषध तयार करतांना व फवारतांना जरुर ते शरीर संरक्षक कपडे व इतर उपकरणे जसे की मास्क, चश्मा, बूट, हातमोचे वापरावीत.

(१२) शक्यतो पिकांवर फवारण्याचे मिश्रण हाताने न ढवळता ते ढवळण्यासाठी लागडी काठी किंवा इतर साहित्य वापरावे.

(१३) औषध फवारणी वाऱ्याच्या दिशेने करावी म्हणजे हे औषध पिकांवर चांगले पसरते. विरुद्ध दिशेने फवारणी करू नये. त्यामुळे नाका-तोंडावाटे हे औषध पोटात जात नाही.

(१४) पेरणीनंतर किटकनाशक व बुरशीनाशकाची बिजप्रक्रीया केलेले बियाणे शिल्लक राहील्यास खाण्याकरीता वापरु नये. तसेच जनावरांना खायला देऊ नये, ते कंपोस्ट साठी वापरावे अथवा जमिनीत पुरुन टाकावे.

(१५) शक्यतो औषध फवारण्याचे काम एकाच माणसाकडून सतत करुन न घेता आळीपाळीने करुन घ्यावे. त्याचप्रमाणे दुपारच्या वेळी हे काम न करता सकाळी व संध्याकाळी करावे.

(१६) तणनाशके फवारणीचा पंप चुकूनही कीटकनाशके फवारणीसाठी वापरू नये.

(१७) कीटकनाशक वापरण्यापूर्वी लेबल व माहिती पत्रक वाचून दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करावे.

(१८) डब्यावरील लाल रंगाचे पतंगाच्या आकाराचे चिन्ह असलेली कीटकनाशके सर्वात विषारी त्यानंतर पिवळा, निळा व हिरवा असा क्रम लागतो. हि चिन्हे सोपी व सर्वसाधारण निरक्षर व्यक्तीसाठी समजण्यासाठी असतात. म्हणजेच हिरव्या रंगाचे चिन्ह असलेली कीटकनाशके कमीत कमी विषारी असतात. अशी कमीत कमी विषारी कीटकनाशके भाजीपाला पिकासाठी वापरावे.

(१९) भाजीपाला किंवा जनावरांचे गवत अश्या पिकांवर औषध फवारल्यानंतर त्या भाज्या किंवा चारा किमान ५-१५ दिवस तरी खाण्यासाठी घेऊ नये. ५-१५ दिवसानंतर स्वच्छ पाण्याने धुवून त्याचा खाण्यासाठी वापर करावा.

(२०) फवारण्याचे काम पूर्ण झाल्यावर अंगावरील कपडे तसेच सर्व अंग साबणाने व पाण्याने स्वच्छ धुवावे.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ९१४६४१२२१०)